# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४/२००९/ दिनांक :

श्री. शशिंकात संपत खुस्पे, अर्जदार
मु.पो. निढळ, ता. खटाव, जि. सातारा

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
सातारा विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय,
वडूज

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग,
उप विभाग, औंध, जि. सातारा.

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे                    दिनांक : २३.०५.२००९

श्री. शशिकांत संपत खुस्पे, मु.पो. निढळ, ता. खटाव, जि. सातारा यांनी ३ अश्वशक्ती शेती पंपासाठी दि. ८.२.२००३ रोजी अनामत रक्कम भरली आहे. अद्यापी कनेक्शन मिळाले नाही म्हणून अंतर्गत कक्ष, सातारा येथे प्रथम तक्रार दाखल केली व त्यानंतर अ फॉर्ममध्ये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर येथे दि. ३.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. तक्रार दाखल झालेवर वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व त्यनंतर सातारा सर्कल कार्यालय, सातारा येथे दि. ३०.३.२००९ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्यावेळी स्वत: ग्राहक व प्रतिनिधी म्हणून श्री. तानाजी मा. मांडवे तसेच वि.प.तर्फे औंध उप विभागाचे सहाय्यक अभियंता हजर होते.

मूळ तक्रार, वि.प.ने सादर केलेली कागदपत्रे, सुनावणीच्यावेळी केलेली कथने व दाखल केलेले म्हणणे याचा एकत्रित विचार करता, तक्रारदाराच्या तक्रारीचे स्वरुप व वि.प.ची कार्यवाही पुढील प्रमाणे –

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप

श्री. खुस्पे यांनी दि. ८.३.२००३ रोजी ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी अनामत रक्कम भरली आहे. तथापी वीज जोडणी दिलेली नाही. वीज जोडणी त्वरीत द्यावी तसेच स्टेट बँकेच्या नियमाप्रमाणे अनामत म्हणून भरलेलल्या रकमेवर व्याज मिळावे अशा स्वरुपाची सर्वसाधारण तक्रार आहे.

वि.प.चे म्हणणे व कार्यवाही

सातारा जिल्ह्यातील वडूज विभागात औंध हा उप विभाग आहे. सदर उप विभागामध्ये शेतीपंपाच्या जोडणीसाठी अनामत रक्कम भरलेल्या ग्राहकांची संख्या १०१४ आहे व त्यातील केवळ ३९१ ग्राहकांनी तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर ग्राहकास ०.२२५ कि.मी. उच्चदाबाची लाईन ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी व ६३ केव्हीएचे रोहित्र उभे करावयाचे आहे. त्यास एसपीए/१६१/०२-०३ ने मंजुरी दिलेली आहे. मटेरियलच्या तुटवड्यामुळे नवीन लाईन उभी करणे (उच्चदाब व लघुदाब), ट्रान्सफॉर्मर सेंटर उभे करणे इ. कामें होवू शकली नाहीत. नव्याने कामे पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी परिमंडल कार्यालय, कोल्हापूर, मंडल कार्यालय, सातारा यांच्यातर्फे टेंडर्स प्रसिध्द केली, परंतु मान्यताप्राप्त ठेकेदरांनी टेंडर्स न भरल्यामुळे कामें प्रलंबित राहिली आहेत. सध्या मे. विश्वजीत लोमटे, नासिक यांना अअ/पत्र क्र. १४१२३ दि. २६.१२.२००८ रोजी काम दिलेले आहे. तसेच जेष्ठता यादीनुसार शेतीपंप जोडण्या देण्याचे आदेश दिलेले आहेत. पत्र क्र १६४८ दि. १३.३.२००९ नुसार कंत्राटदार यांना श्री. शशिकांत खुस्पे यांची जोडणी देण्याचा आदेश दिलेला आहे.

सर्व कागदपत्रें, वि.प.कडील कार्यवाही, सुनावणीच्यावेळी उभयतांनी केलेली कथने व दाखल केलेले कागद यांचा विचार करता, आम्ही खालील निष्कर्षाप्रत आलो आहोत.

श्री. शशिकांत खुस्पे या ग्राहकाने वा त्याच्या वतीने अर्ज करणारे प्रतिनिधी श्री. मांडवे यांनी तक्रार प्रकरणी नेमकी कोणती कागदपत्रे हजर करावीत, तसेच मागणी कोठे करावी याची पूर्णपणे माहिती नसावी. कारण तक्रार दाखल करतांना नेमके आवश्यक कागद पुराव्यासाठी दाखल करणे महत्वाचे आहे. त्यांच्याकडून तसे झाले नाही. अनावश्यक बरेच कागद प्रकरणी जोडलेले आहेत.

जशी ग्राहकाची परिस्थिती तशीच वि.प.ची स्थिती आहे. वि.प.ने सादर केलेल्या कागदपत्रांतील तपशिलात विसंगती आढळते. उदा. जेष्ठता यादी क्र. ५१० का ५७६ हे स्पष्ट होत नाही. तसे अनामत रक्कम भरल्याची तारीख ८.२.२००३ का ८.३.२००३ हे स्पष्ट होत नाही. ग्राहकाने दि. १८.१२.२००६ रोजी चाचणी अहवाल दिल्याचे वि.प.ने आपल्या पत्रात नमूद केले आहे. त्यान अरुषंगाने दि. १८.१२.२००६ रोजी अर्जाची पूर्तता झालेली असल्याने तसेच नवीन रोहित्र उभारणी व एल.टी. व एच.टी. लाईनची उभारणी असल्याने अर्ज पूर्ण तारखे पासून १ वर्षाचा कालावधी कृती मनाकातील तरतुदीनुसार गृहीत धरता येईल. मात्र त्यानंतरहि जोडणी न दिल्याने दि. १८.१२.२००७ नंतरचा जोडणी मिळेपर्यंतचा कालावधी भरपाईसाठी योग्य आहे. तथापी ग्राहकाने भरपाईची मागणी न करता केवळ त्वरीत वीज जोडणीची मागणी केल्याने तशी जोडणी देण्याचे वि.प.नेही मान्य केले आहे.

## आदेश

१) नव्याने तपासणी अहवाल घेवून ३० दिवसांचे आंत वीज जोडणी द्यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य ग्राहक
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष :

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :